**CNR : MHST05000121-2017**

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ११५/२०१७</u>**

सुनिल गोविंद यादव ..... **वादी**

**वि.**

महाराष्ट्र सरकार वगैरे ..... **प्रतिवादी**

**<u>नि. २६ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत व विना म्हणणे दावा चालविण्याचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकिलांचे निवेदन असे की, सदर कामी काही कार्यालयीन कामामुळे कैफियत व म्हणणे वेळेवर देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द विनाकैफियत दावा चालविण्याचा तसेच विना म्हणणे तुर्तातुर्त ताकीद अर्ज चालविणेचा आदेश झाला आहे. दावा गुणावगुणावर चालणेसाठी प्रतिवादींविरुध्द झालेला सदरचा आदेश रद्द होवून त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेची परवानगी मिळावी. वादीच्या वकीलांचे निवेदन असे की, प्रतिवादींनी जाणून बुजून विलंब केलेला आहे. प्रस्तुत अर्जास विलंबाबत कोणतेही संयुक्तीक कारण नाही. प्रतिवादी मे. कोर्टाचे हुकुमाचे पालन करीत नाहीत, किती विलंब झाला हे अर्जात नमूद नाही म्हणून तो नामंजूर करावा व मंजूर करावयाचा झाल्यास रु.५०००/- खर्च वादीस देण्यात यावा.

४. प्रतिवादींचा अर्ज व त्यावर वादीने दिलेले म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी केलेला असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादींचे

विरुध्द नि.१ वर एकतर्फा दावा चालविणेचा आदेश झालेला आहे. सदरचा आदेश रद्द करून प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत व म्हणणे दाखल करून घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचेविरुद्ध झालेला एकतर्फा दावा चालविणेचा आदेश रद्द करून प्रतिवादी यांना कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करणेस परवानगी देणेत आली आहे.

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.09.27 17:06:01 +0530

कराड. (प्र. अ. सवदीकर)
दि. २७/०९/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड